महाराष्ट्र विधानसभा

(बल्लारपूर विधानसभा क्ष.)
गोल बाजार वार्ड,
चंद्रपूर (म.रा.) ४४२ ४०२

आवक क्रमांक 26८

दूरध्वनी : कार्यालय – २५२५८२ • निवास – २५६०६९ • फॅक्स (०७१७२) २५८८००
मुंबई – २२०२१५८५ • विस्तार – ४१७

जावक क्रमांक : २८८/जाने/१० दिनांक : १५.१.२०१०

प्रति,

मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक
म.रा. नागपूर

सप्रेम जय विदर्भ !

महोदय,

देशविख्यात ताडोबा राष्ट्रीय उद्यानात पर्यटकांना अनेक समस्यांचा आणि गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. दोन वर्षापूर्वी ताडोबाच्या आतील आणि तलावाजवळचे विश्रामगृह पर्यटकांसाठी बंद.करण्यात आले. पर्यटकांसाठी पर्यायी व्यवस्था न करताच हा निर्णय घेण्यात आला.

दोन लाखापेक्षा जास्त खर्चाचे काम निविदा काढूनच केले पाहिजे असे नियम आहे, परंतु या नियमाला बगल देत श्री. नंदकुमार मुख्य वनसंरक्षक (वन्य जीव) यांच्या सूचनेवरून नव्या पर्यटन संकुल उभारणीचे काम कोणतीही निविदा न काढता वर्धेच्या ग्रामोपयोगी विज्ञान केंद्राला देण्यात आले आहे. या केंद्रासोबत एका साध्या कागदावर करार करण्यात आला आहे. तीन हफ्त्यात या केंद्राच्या उभारणीसाठी एक कोटी रूपये निधी देण्यात आला आहे. हा व्यवहार करताना या केंद्राकडून कोणतीही सुरक्षा हमी घेण्यात आली नाही. एक वर्षाचा कालावधी लोटूनही या केंद्राने एकाही संकुलाचे बांधकाम पूर्ण केले नाही, अशी माहिती प्राप्त झाली आहे. हा एकूणच प्रकार अतिशय गंभीर आहे.

१. सदर काम निविदा प्रकाशित न करता कोणत्या नियमानुसार देण्यात आले आहे ?

२. श्री. नंदकुमार मुख्य वनसंरक्षक वन्य जीव यांच्या सूचनेवरून वरील संस्थेला सदर काम देण्यात आले आहे काय ?

३. विना निविदा हे काम देण्यात आले असल्यास त्याची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचा निष्कर्ष काय आहे ?

४. सदर पर्यटन संकुलांचे बांधकाम केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

वरील प्रश्नांच्या अनुषंगाने त्वरीत खुलासा करण्यात यावा, ही विनंती. तसेच निविदा प्रसिद्ध न करता करण्यात आलेल्या सदर कामाची चौकशी करून त्याअनुषंगाने संबंधितांवर कडक कारवाई करावी, ही विनंती.

योग्य सहकार्याची अपेक्षा.

सविनय धन्यवाद !

आपला स्नेहांकित

(सुधीर मुनगंटीवार)